# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय जा.क्र. :** अम/सका- ०५ **दिनांक :** ०३-१२-२०२०.

अहमदनगर महानगरपालिकेच्या विशेष सभेची सुचना (ऑनलाईन ॲप व्दारे)

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (ड)अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०५, मंगळवार दिनांक - ०८ / १२ /२०२०.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती.......................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

याद्वारे कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा क्रमांक - ५ **मंगळवार दिनांक ०८/१२/२०२० रोजी दुपारी १.०० वाजता** मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन ॲप व्दारे सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

तरी आपणांस सदर सभेस ॲप व्दारे ऑनलाईन सहभागी होण्याची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावांची टिप्पणी
३. मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्र.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**टिप :-** १) प्रत्येक सदस्याने आपल्या Android / Smartphone मध्ये Playstore वरुन AMC Corporator official What's App मध्ये निर्देश दिल्यानुसार ॲप डाउन लोड करुन घेणे.
२) वरिलप्रमाणे ॲप व्दारे प्रत्येक सदस्यांना मा.महासभेस उपस्थित राहता येईल.
३) मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये कळविले नुसार सदरची सभा ऑनलाईन ॲप व्दारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रिये संदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा. सदस्यांनी महानगरपालिका सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी मो.नं.९५६१००४६४४ यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक-५ मंगळवार दिनांक - ०८ / १२ / २०२० रोजी दुपारी १.०० वाजता
मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन ॲप व्दारे होणा-या विशेष सभेची विषय पत्रिका.

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| २२ | निविदा सिक्युरीटी डिपॉझिट पोटी दाखल केलेली मुदतठेव पावती ( F.D.R ) निविदाकार यांना परत करणेस मंजुरी मिळणे बाबत. |
| २३ | श्री.भरत विजय छजलानी, सफाई कामगार यांनी सादर केलेले त्यांची आई श्रीमती.मधुमती विजय छजलानी यांचे वैद्यकीय खर्चाचे परतावा देयक अदा करणे बाबत निर्णयाकरीता प्रस्ताव. |
| २४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या कोंडवाडा विभागामधील हंगामी कर्मचारी कै.बाबाजी शिंदे यांना आर्थिक मदत उपलब्ध करुन देणे बाबत. मा.आ.श्री.संग्राम अरुणकाका जगताप, विधानसभा सदस्य, अहमदनगर यांचे जा.क्र.१९२८/१९ दि.३०/०८/२०१९ रोजीचे पत्र. |
| २५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील क्षेत्राचा केंद्र सरकारच्या "अमृत मिशन" या महत्वाकांक्षी कार्यक्रमा अंतर्गत भौगोलिक माहिती प्रणालिच्या आधारे सुधारीत विकास आराखडा तयार करणेची प्रक्रीया सुरु करणे बाबत |
| २६ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : ०३ / १२ /२०२०.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०५ प्रस्ताव क्रमांक : २२ दिनांक:- ०८/१२/२०२०**

---

**प्रस्तावाचा विषय :** निविदा सिक्युरीटी डिपॉझिट पोटी दाखल केलेली मुदतठेव पावती ( F.D.R ) निविदाकार यांना परत करणेस मंजुरी मिळणे बाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- कुंदन सर्जिकल्स, अहमदनगर यांचा दिनांक ०१/०१/२०२० रोजीचा दिनांक १८/०१/२०२० रोजी प्राप्त अर्ज.

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की, सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरीता अहमदनगर महानगरपालिका सर्व दवाखाने व रक्तपेढी करीता आवश्यक असणारी औषधे, रसायने, वैद्यकीय साहित्य व उपकरणे इ.पुरवठा वार्षिक निविदा निविदाकार कुंदन सर्जिकल्स, अहमदनगर यांनी भरली होती. त्यांची निविदा मंजूर झाल्याने त्यांनी माणक क्र.JV००१७५८९७ दि.०५/०३/२०१५ अन्वये डिपॉझिट रक्कम रु.१,२५,०००=०० फक्त भरुन करारनामा करुन दिलेला आहे.

अर्जदार यांनी भरलेली सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम परत मिळणे बाबत संदर्भीय अर्जान्वये मागणी केलेली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१९०(३) अन्वये तीन वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या सर्व शिलकी प्रत्येक वर्षाअखेर महानगरपालिकेकडे व्यपगत होतात. उपरोक्त निविदा सिक्युरीटी डिपॉझिट रक्कम भरुन तीन वर्षापेक्षा जादा कालावधी झालेला आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१९०(४) अन्वये सदर निविदा बयाणा/डिपॉझिट रक्कम परत देणेकरीता मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यकता असते.

मा.महासभा ठराव क्र.१९ दिनांक ३१/०८/२०१५ अन्वये दिनांक ३१/०८/२०१५ रोजी ज्या मजूर संस्था, पुरवठादार व अन्य करारकर्ते यांनी अहमदनगर महानगरपालिकेकडे भरलेले सिक्युरिटी डिपॉझिट (एफ.डी.आर.), रोख भरलेले व बिलातून कपात केलेल्या, महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१९०(३) अन्वये ३ वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या सर्व शिलकी व्यपगत रक्कमा संबंधित रक्कमा भरणारांनी अर्ज करुन मागणी केल्यास आवश्यक त्या बाबी तपासुन त्यांना रिफंड करणेस मा.महासभेने मान्यता दिलेली आहे.

तरी मा.महासभा ठरावर क्र.१९ दिनांक ३१/०८/२०१५ चे मंजुरी अन्वये संदर्भीय निविदाकार कुंदन सर्जिकल्स, अहमदनगर यांचे मागणी प्रमाणे त्यांनी डिपॉझिट रक्कमेपोटी महानगरपालिकेत जमा केलेली रक्कम रुपये १,२५,०००=०० फक्त (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पंचवीस हजार फक्तची) मुदतठेव पावती त्यांना परत करणेस मंजूरी मिळावी हि विनंती. आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा दिनांक ०४/०३/२०२० रोजीचा अभिप्राय की, मा.महासभा ठराव क्र.१९ दिनांक ३१/०८/२०१५ पृष्ठ क्र.३ वरिल मध्ये रिफंड बाबत प्रस्ताव तयार केला आहे. व सविस्तर कामाचे बाबनिहाय यादी सोबत जोडली त्याप्रमाणे कुंदन सर्जिकल्स यांचे नाव यादीमध्ये दिसुन येत नाही. विभागाने

खात्री करुन फेरसादर करावे. अटी व शर्ती प्रमाणे पुरवठा समाधानकारक झाल्याबाबत विभाग प्रमुख यांनी खात्री करावी.

यावर स्टोअर विभागाकडुन दिनांक ०५/०३/२०२० रोजी फेरसादर रिपोर्ट की, मा.महासभा ठराव क्रमांक १९ दिनांक ३१/०८/२०१५ अन्वये दिनांक ३१/०८/२०१५ रोजी ज्या मजूर संस्था, पुरवठादार व अन्य करारकर्ते यांनी अहमदनगर महानगरपालिकेकडे भरलेले सिक्युरिटी डिपॉझिट (एफ.डी.आर.), रोख भरलेले व बिलातून कपात केलेल्या, महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१९०(३) अन्वये ३ वर्षापेक्षा मुदती पर्यंत मागणी न केलेल्या सर्व शिलकी व्यपगत रक्कमा संबंधित रक्कमा भरणारांनी अर्ज करुन मागणी केल्या आवश्यक त्या बाबी तपासुन त्यांना रिफंड करणेस मा.महासभेने मान्यता दिलेली आहे. (पा.नं.४ ते ५) अर्जदार कुंदन सर्जिकल्स, अहमदनगर यांनी दिनांक ०१/०१/२०२० रोजीचा दिनांक १८/०१/२०२० रोजी प्राप्त अर्जान्वये त्यांनी भरलेली सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम रु.१,२५,०००/- फक्त परत मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाची मुदत संपल्याने व त्यांनी महानगरपालिकेच्या पुरवठा आदेशाप्रमाणे औषधे, रसायने, वैद्यकीय साहित्य व उपकरणांचा समाधानकारकरित्या पुरवठा केल्याने मा.महासभा ठराव क्र.१९ दि.३१/०८/२०१५ चे मंजुरी अन्वये संदर्भीय निविदाकार कुंदन सर्जिकल्स, अहमदनगर यांचे मागणी प्रमाणे त्यांनी डिपॉझिट रक्कमेपोटी महानगरपालिकेत जमा केलेली रक्कम रुपये १,२५,०००=०० फक्त (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पंचवीस हजार फक्तची) मुदतठेव पावती त्यांना परत करणेस मंजूरी मिळावी हि विनंती. आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, सदरची F.D.R. पावती दिनांक ०५/०३/२०१५ आहे व मा.महासभेचे ठराव दिनांक ३१/०८/२०१५ नुसार सदर पावती व्यपगत ३ वर्षे नंतर होत असल्याने मा.महासभाची सदर रिफंड बाबत मान्यता घेवुन फेरसादर करावे. मुळ आक्षेप कायम आहे.

यावर स्टोअर विभागाकडुन दिनांक ११/०३/२०२० रोजी फेरसादर रिपोर्ट की, अर्जदार कुंदन सर्जिकल्स, अहमदनगर यांनी प्रमाणक क्र.JV००१७५८९७ दि.०५/०३/२०१५ अन्वये रक्कम रु.१,२५,०००=०० फक्त निविदा डिपॉझिट भरलेली आहे. पुरवठादार यांनी ३ वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यत रिफंडबाबत अर्ज करुन मागणी केलेली नसल्याने सदरची रक्कम व्यपगत झालेली आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१९०(३) अन्वये तीन वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या सर्व शिलकी प्रत्येक वर्षा अखेर महानगरपालिकेकडे व्यपगत होतात.

मा.महासभा ठराव क्र.१९ दिनांक ३१/०८/२०१५ अन्वये दि.३१/०८/२०१५ रोजीपर्यंत ज्या मजूर संस्था, पुरवठादार व अन्य काररकर्ते यांनी अहमदनगर महानगरपालिकेकडे भरलेले सिक्युरिटी डिपॉझिट (एफ.डी. आर.), रोख भरलेले व बीलातून कपात केलेल्या महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१९०(३) अन्वये ३ वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या सर्व शिलकी व्यपगत रक्कमा संबंधित रक्कमा भरणारांनी अर्ज करुन मागणी केल्यास आवश्यक त्या बाबी तपासुन त्यांना रिफंड करणेस मा.महासभेने मान्यता दिलेली आहे. (पा.नं.४ ते ५)

पुरवठादार यांनी उपरोक्त पारित झालेल्या ठरावापूर्वी म्हणजे दि.०५/०३/२०१५ रोजी निविदा डिपॉझिट रक्कम भरलेली असल्याने व उपरोक्त ठरावान्वये महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१९०(३) अन्वये ३ वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या सर्व शिलकी व्यपगत रक्कमा संबंधित रक्कमा ीरणारांनी अर्ज करुन मागणी केल्यास रिफंड करणेस मंजुरी दिलेली असल्याने व अर्जदार यांनी दिनांक ०१/०१/२०२० रोजीच्या (दि.१८/०१/२०२० रोजी प्राप्त) अर्जान्वये मागणी केलेली असल्याने त्यांची डिपॉझिट रक्कम रिफंड करता येईल.

सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाची मुदत संपल्याने व पुरवठादार यांनी महानगरपालिकेच्या पुरवठा आदेशाप्रमाणे औषधे, रसायने, वैद्यकीय साहित्य व उपकरणांचा समाधानकारक रित्या पुरवठा केलेला आहे.

तरी मा.महासभा ठराव क्रमांक १९ दिनांक ३१/०८/२०१५ चे मंजूरी अन्वये संदर्भीय निविदाकार कुंदन सर्जिकल्स, अहमदनगर यांचे मागणी प्रमाणे त्यांनी डिपॉझिट रक्कमेपोटी महानगरपालिकेत जमा केलेली रक्कम रुपये १,२५,०००=०० फक्त (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पंचवीस हजार फक्तची) मुदतठेव पावती त्यांना परत करणेस मंजुरी मिळावी हि विनंती. आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.मुलेप यांचे अभिप्रायाचे अवलोकन करुन लेखा संहिताच्या तरतुदी प्रमाणे मा.मुलेअ यांचे ठेवी व्यपगत झाले नसल्याचे महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता २०११ मधील ३०० व २९९ प्रमाणे कार्यवाही करावी.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, सदर ठेवीच्या रक्कमा व्यपगत झालेले असल्यामुळे न.पा. लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१९०(३) अनवये न.पा.मान्यतेने ठेव परत देणे योग्य होईल.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा फेरसादर अभिप्राय की, मा.मुलेअ यांचे अभिप्राया नुसार अ बाबत उचित निर्णय घ्यावा.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, महासभा ठराव क्र.१९ दि.३१/०८/२०१५ नुसार ३१/०८/२०१५ रोजी ज्या मक्तेदारांच्या डिपॉझिट रक्कमेस ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. त्यांची कागदपत्रे तपासुन रिफंड करणेस मान्यता दिली आहे. तथापि प्रस्तावित Deposit रक्कमेस दि.२४/०२/२०२० रोजी तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. त्यामुळे मु.ले.अ व मुलेप यांचे अभिप्रायानुसार महासभेची मान्यता घेवून पुढील कार्यवाही करावी लागेल.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** ऑफिस रिपोर्टचे वाचन करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आज शेतक-यांचे भारत बंद आंदोलन आहे शतक-यांसाठी हितासाठी ठराव करु महाराष्ट्रातील शेतकरी दिल्लीला गेले आहे. शेतकरी हिताचे कायदे करावे आताचे कायदे रद्द करावे . पक्ष न पाहता करावे.

**मा.महापौर साहेब :-** आपल्या भावना लक्षात आल्या. ऑफीस रिपोर्ट मंजूर. फॉरफीट झालेली रक्कम अदा करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजुर. कुंदन सर्जिकल्स, अहमदनगर यांचे, मेसर्स.ए.पी.सोनीमंडलेचा यांचे नांवे असलेली व ए.सी.कोठारी यांचे ई-निविदा क्रमांक ९५६, ९५७, १०७९ व निमिट्स प्रमोटस् ॲण्ड डेव्हलपर्स यांचे ई-निविदा क्रमांक ११३५ यांचे तीन वर्षापेक्षा जास्त झालेल्या कालावधीतील सिक्युरिटी डिपॉझीट ( एफ. डी. आर.), रोख भरलेले व बिलातून कपात केलेली रक्कम रिफंड देणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.संपत विजय बारस्कर

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०५** **प्रस्ताव क्रमांक : २३** **दिनांक:- ०८/१२/२०२०**

---

**प्रस्तावाचा विषय :** श्री.भरत विजय छजलानी, सफाई कामगार यांनी सादर केलेले त्यांची आई श्रीमती.मधुमती विजय छजलानी यांचे वैद्यकीय खर्चाचे परतावा देयक अदा करणे बाबत निर्णयाकरीता प्रस्ताव.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- आपले कडील जा.क्र.७३ दिनांक २८/११/२०१७ रोजीचे पत्र.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कर्मचा-याचे नांव | : | श्री.भरत विजय छजलाणी |
| २) | रुग्णाचे नांव | : | श्रीमती.मधुमती विजय छजलाणी |
| ३) | कर्मचा-याशी नाते | : | आई |
| ४) | पदनाम | : | सफाई कामगार |
| ५) | हॉस्पीटलचे नांव | : | जहांगीर हॉस्पीटल, पुणे |
| ६) | आंतररुग्ण कालावधी | : | २१/०६/२०१८ ते २८/०६/२०१८ |

अ)

| औषधाचे खर्च | |
|---|---|
| एकुण खर्च | एकुण खर्चाच्या ९०% |
| ६२८८१/- | ५६५९३/- |

ब)

| वास्तव्याचा खर्च | वास्तव्याचा खर्चाच्या ९०% |
|---|---|
| एकुण खर्च ४९०३१३/- | --- |
| रिलइगर हेल्थ इन्सुरन्स १०००००/- व रुमचार्जेस २०४०० वजा जाता एकुण खर्च ३०७०३२/- चे (९०%) | २७६३२९/- (९०%) |
| सर्वसामान्य कक्ष रोज रु.८००/- प्रमाणे ३ दिवस २४००/- अतिदक्षता कक्ष रोज रु.४५००/- प्रमाणे ४ दिवस १८०००/- | २२८० (९५%)<br>१८०००/- (१००%) |
| **एकुण** | **२,९६,६०९/-** |

तरी मा.महासभा ठराव क्रमांक ३० दिनांक ०७/१२/२०१६ ने मा.शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र २०१६ २०१६/प्र.क्र.१६२०१६/राकावि-२ दि.१६ मार्च २०१६ अन्वये मा.आयुक्त यांना

तीन लक्षा पर्यंत कर्मचारी वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती देणे बाबत अधिकार देण्यांत आलेले असुन तीन लक्षाच्या पुढील वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती देण्या बाबतच्या वैद्यकीयखर्चाची प्रतीपुर्ती प्रकरण तपासून मा.महासभेच्या मंजुरीसाठी ठेवण्याबाबत सुचित केलेले आहे. सबब सदर देयकाची एकुण देय रक्कम अक्षरी रु.तीन लाख त्रेपन्न हजार दोनशे दोन होत असुन सदर देयकाची मा.मुख्य लेखा परीक्षक यांचेकडून तपासणी होवुन सदर देयक मंजुरी साठी मा.महासभेकडे सादर करणेस तसेच मा.महासभेच्या मंजुरीने सदर देयकाची रक्कम रु.तीन लाख त्रेपन्न हजार दोनशे दोन संबंधितास अदा करणेस हरकत नाही.

(३,५३,२०२/-)

एकुण खर्च = अ + ब

३,५३,२०२ = ५६५९३ + २,९६,६०९/-

इतकी रक्कम मंजूरीस मान्यतेस्वि सादर.

लेखाशिर्ष : वैद्यकीय प्रतीपुर्ती खर्च ८००००००/- (सन २०२०-२०२१)

तरतुद रक्कम : ८००००००/-

आतापर्यंत झालेला खर्च : ६००५१७/-

उपलब्ध शिल्लक : ७३९९४८३/-

अपेक्षित खर्च : ३,५३,२०२/-

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.सहाय्यक आयुक्त यांच्या दिनांक २९/१०/२०२० च्या प्रस्तावित अ नुसार सदर देयक रु. ३,५३,२०२/- मा.महासभेच्या मंजूरीनुसार अदा करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

--*--

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** श्री.भरत विजय छजलानी, सफाई कामगार यांनी सादर केलेले त्यांची आई श्रीमती.मधुमती विजय छजलानी यांचे वैद्यकीय खर्चाचे परतावा देयक अदा करणेचा ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** प्रभाग क्र.७ मध्ये तोफखाना पोलीस स्टेशन ५-७ कि.मी. आहे. प्रभागामध्ये पोलीस चौकी मिळावी महानगरपालिकेचे भवन आहे त्या ठिकाणी पोलीस चौकी व्हावी. मा.आमदार जगताप, मा.पालकमंत्री हसनजी मुश्रीफ यांच्याकडे वारंवार पाठपुराव करुन पोलीसचौकीत एस.पी. ची तात्पुरती मंजूरी दिली आहे. बोल्हेगांव मध्ये संत नागरगोजे भवन आहे त्याठिकाणी अवैध व्यवसाय सुरु आहे. त्या भवनाला महानगरपालिकेचा वॉचमन नाही. पोलीस चौकीला मंजूरी मागीतली आहे. त्याठिकाणी पोलीस चौकीला लाईट टेबल खुर्च्या नागरिकांच्या वतीने आम्ही गोळा केले आहे. ते त्यांना द्यायचे आहे. वाढती लोकसंख्या त्या भागात आहे. पोलीसांना प्रभागात यायला वेळ लागतो. महिलांची छेडछाड, गाडया जाळणे, अवैध व्यवसाय असे प्रकार वारंवार घडत आहेत. प्रभाग क्रमांक ७ बोल्हेगांव भागामध्ये एक पोलीस चौकी असावी पोलीस प्रशासनाला जागा दाखविली ती त्यांना मान्य आहे. सांस्कृतिक भवनाची जागा पोलीस चौकीला दिल्यास त्या ठिकाणी अवैध व्यवसाय बंद होतील.

**मा.आयुक्त साहेब :-** कायद्याच्या तरतुदीच्या अनुषंगाने तात्पुरती देवू शकते ते टीपी कडून शेरे घ्यावे. सध्याचा वापर काय आहे त्याची पडताळणी करण्यात येईल.

**नगररचनाकार :-** अर्जाबद्दल बोलतो बांधकाम नियंत्रण नियमावली नुसार ज्या कारणासाठी बांधकाम परवानगी दिली त्याच कारणासाठी वापर अभिप्रेत आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** अधिकार आहे. वापर तेथे अनुज्ञेय होईल का.

**मा.महापौर साहेब :-** टी.पी.ने पाहणी करुन आयुक्तांना अहवाल द्या. कायदेशीर बाबी पूर्ण करुन जागा देवून टाका.

--*--

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजुर. अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी श्री.भरत विजय छजलानी, सफाई कामगार यांच्या आई श्रीमती.मधुमती विजय छजलानी यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्ती देयकाबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावास व सदरच्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदरच्या प्रकरणात अंतिम कार्यवाही करतांना मा.आयुक्त यांची प्रतिस्वाक्षरी घेण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

महासभेत झालेली चर्चा नगरसेवक मा.श्री.कुमार वाकळे यांनी केलेल्या सुचनेनुसार बोल्हेगांव मध्ये महानगरपालिकेचे संत नागरगोजे भवन असुन सदर ठिकाणी पोलीस चौकीसाठी जागेच्या मागणी नुसार नगररचना विभागाने पाहणी करुन कायदेशीर बाबी तपासुन जागा देणेबाबत कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी.

सुचक :- मा.श्री.कुमार बबन वाकळे

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०५ प्रस्ताव क्रमांक : २४ दिनांक:- ०८/१२/२०२०**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या कोंडवाडा विभागामधील हंगामी कर्मचारी कै.बाबाजी शिंदे यांना आर्थिक मदत उपलब्ध करुन देणे बाबत.
मा.आ.श्री.संग्राम अरुणकाका जगताप, विधानसभा सदस्य, अहमदनगर यांचे जा.क्र. १९२८/ १९ दि.३०/०८/२०१९ रोजीचे पत्र.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- मा.आ.श्री.संग्राम अरुणकाका जगताप, विधानसभा सदस्य, अहमदनगर शहर मतदार संघ यांचे जा.क्र.१९२८/१९ दिनांक ३०/०८/२०१९ चे पत्र.

वरिल संदर्भांकित विषयान्वये मा.आमदार श्री.संग्राम जगताप यांनी पुढील प्रमाणे निवेदन दिलेले आहे. "आरोग्य विभागाच्या कोंडवाडा विभागामध्ये हंगामी कर्मचारी म्हणुन कै.बाबाजी शिंदे रा.वैदुवाडी, सावेडी, अहमदनगर हे कार्यरत होते. दिनांक २५/०८/२०१९ रोजी त्यांचा डेंग्यू सदृश्य आजाराने मृत्यू झाल्याचे वर्तमान पत्रातून समजले आहे. सदर व्यक्ती कोंडवाडा विभागात श्वान पकडण्याचे काम करत असल्याचे समजले. हे काम करत असतांना स्वतःचे व आरोग्याचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने मनपाकडून कोणतीही सुविधा या कोंडवाडा विभागांतर्गत काम करणा-या कर्मचा-यांना उपलब्ध करुन दिली जात नाही. त्यामुळेच या मयत व्यक्तीला आजार जडल्याचे त्यांच्या कुटुंबियांच्या बोलण्यातून आले असे पत्रामध्ये नमूद केलेले आहे. तसेच मयत कै.शिंदे यांना गेली तीन वर्षे झाले मनपाकडून मानधन मिळालेले नाही ही धक्कादायक बाब कुटुंबीय प्रचंड आथ्रिक अडचणीत मनपाच्या आरोग्य विभागाच्या अनागोंदी कारभारामुळे आले आहे. तसेच मनपा प्रशासना विषयी या घटनेमुळे प्रचंड रोष आहे. तसेच वैदुवाडी भागातील नागरिकांनी शिंदे कुटुंबियांना आर्थिक मदत मनपाकडून मिळवून देण्याची मागणी मा.आमदार श्री.संग्राम अरुणकामा जगताप यांचेकडे केलेली आहे. येत्या दोन दिवसात शिंदे कुटुंबियांना मनपाकडून आर्थिक मदत उपलब्ध न झाल्यास त्याबाबत वैदुवाडी परिसरातील नागरीक व शिंदे कुटुंबियासमवेत लोकशाही पध्दतीने आंदोलन करण्यात येईल" असे पत्रामध्ये नमूद केलेले आहे.

त्याअनुषंगाने सादर करण्यांत येते की, मयत कर्मचा-यांसह इतर ११ कर्मचारी यांची नियुक्ती हंगामी कर्मचारी म्हणुन ३ महिने अथवा ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अगोदरच्या कालावधी करीताच नियुक्ती करण्यांत आलेली आहे. त्यांचे कार्यादेशातील अटी व शर्तीमधील अट क्रमाक ९ नुसार शासन सेवा व शर्तीखाली ही नेमणुक नसल्याने त्याअनुषंगाने मिळणारी रक्कम विमा योजना, तत्सम प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाही. अथवा ज्या पदावर नेमणूक केलेली आहे. त्या पदाच्या करारामध्ये नमूद केलेल्या मुदती बाहेरील कोणतेही अधिकार हंगामी कर्मचा-यांस राहणार नाही. व अट क्र.११ नुसार काम करत असतांना कामाच्या वेळेत जर त्यांना दुखापत झाल्यास त्याबाबतचा औषधोपचाराचा खर्च महानगरपालिके तर्फे करण्यांत येईल. तथापि वरील निवेदनानुसार असे निदर्शनास येते की, मयत बाबाजी शिंदे यांचा मृत्यू मोकाट कुत्रे

बंदोबस्ताच्या कामकाजामध्ये झालेला नाही. मात्र मानवतेच्या दृष्टीकोनातून यापुर्वी नागरिकांना रु.१ लक्षची आर्थिक मदत म्हणुन महानगरपालिकेतर्फे देण्यात आलेली आहे. त्याच पध्दतीने मा.आमदार यांचे मागणीनुसार मयत बाबाजी शिंदे यांचे कुटुंबियांना आर्थिक मदत रु. १ लक्ष अदा करणेस मा.महापौर यांनी आश्वासीत केलेले आहे. त्यानुसार आर्थिक मदत संबंधिताच्या बँक खात्यावर वर्ग करणेस व तसेच मा.आमदार साहेबांना कळविणेस प्रस्ताव सविनय सादर.

मनपा मंजुर बजेट सन २०१९-२०२०

लेखाशिर्ष : आरोग्य आकस्मिक खर्च संकेतांक ६२०२२९०००३

एकुण तरतुद : ५,००,०००

झालेला खर्च : २,९९,९३०/-

प्रस्तावित खर्च : १,००,०००/-

एकुण खर्च रु. ३,९९,८३०/-

शिल्लक तरतुद : १,००,०००/-

यावर वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मंजूरी देणे योग्य तथापि आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय की, अ आदेशार्थ सविनय सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, १) कोंडवाडा विभाग प्रमुख व वेद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी प्रस्तावित केलेल्या टिप्पणीमध्ये सदरचा खर्च कोणत्या अधिनियमातील कलमाखाली देय राहील याबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदवणे दिसून येत नाही. २) आरोग्य विभागाच्या आकस्मीक खर्चातून सदरचा खर्च करता येणार नाही.

३) मयत कर्मचारी यांचा कृत्यम मोकाट कुत्रे बंदोबस्त कामकाजामध्ये झाला नाही. असे टिप्पणीत अभिप्राय नमूद असल्याने वैद्यकीय आरोग्य विभागाचे कार्या आदेश ५४३ दिनांक १७/०७/२०१९ मधील अट क्र.११ प्रमाणे लागू होत नाही. उपरोक्त बाबीची खात्री करुनच "वैद्यकीय आरोग्य अधिकारी" "मुख्यलेखा अधिकारी" यांनी मंजूरीची शिफारस केल्यानुसार वरील अ मान्यतेस्तव.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावित अ मध्ये प्रस्तावित केलेली बाब कृपया अवलोकनार्थ घ्यावी. तसेच मु.ले.प. यांचे अभिप्रायानुसार आकस्मिक खर्चातून प्रस्तावित खर्च करता येणार नाही व करारनाम्यातील अट क्रं.११ नुसार लागू होत नाही.

उपरोक्त अभिप्रायानुसार प्रस्तावित केलेनुसार मा.महासभेची मान्यता धेवून किंवा कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन- याबाबत मा.महापौर यांचे पत्र घेवून आर्थिक मदत देणेकामी पुढील निर्णयार्थ सादर व त्यानुसार मा.आमदार महोदयांना आपण करत असलेल्या व करणार असलेल्या कार्यवाही बाबत लेखी अवगत करणे उचित होईल.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

मा.महापौर साहेब :- ऑफिस रिपोर्ट मंजूर. पुढचा विषय घेण्यांत यावा.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या कोंडवाडा विभागामधील हंगामी मयत कर्मचारी कै.बाबाजी शिंदे यांचे कुटुंबियांना आर्थिक मदत रु. १ लक्ष अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर. प्रशासनाने याबाबत नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

मा.पदाधिकारी यांनी दिलेल्या पत्रानुसार शहर व उपनगरातील विकास कामांसाठी या आर्थिक वर्षामध्ये मा.शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्याने विकास कामे मा.सदस्यांना करण्यास अडचणी येत आहेत. या करीता नागरिकांच्या नागरी सुविधेची कामे करण्यासाठी सन २०२०-२०२१ मधील मा.महापौर शहर विकास निधीची तरतुद १०० टक्के, व उर्वरीत सर्व पदाधिकारी यांची निधीची तरतुद ५० टक्के रोख स्वरुपात ठेवून या निधीतुन विकास कामे सुचवुन कामे झाल्यानंतर त्या कामांची देयके तातडीने अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. याबाबत अर्थ विभागाने महापौर शहर विकास निधी १०० टक्के व सर्व पदाधिकारी यांचा विकास निधी ५० टक्के प्रमाणे तरतुद रोख स्वरुपात राखीव ठेवण्याबाबत कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्रीमती.मालन सुरेश ढोणे

अनुमोदक :- मा.श्री.मनोज शंकर कोतकर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०५ प्रस्ताव क्रमांक : २५ दिनांक:- ०८/१२/२०२०**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील क्षेत्राचा केंद्र सरकारच्या "अमृत मिशन" या महत्वाकांक्षी कार्यक्रमा अंतर्गत भौगोलिक माहिती प्रणालिच्या आधारे सुधारीत विकास आराखडा तयार करणेची प्रक्रीया सुरु करणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- शासनाच्या नगरविकास विभागाचा निर्णय क्रमांक टी.पी.एस.१८१८/१४८९/ प्र.क्र.३०३/१८ नवि-१३ दिनांक २५/०१/२०१९

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयाच्या अनुषंगाने अहवाल खालील प्रमाणे सादर करीत आहे. केंद्र सरकारच्या **"अमृत मिशन"** या महत्वाकांक्षी कार्यक्रमांतर्गत निवड करण्यांत आलेल्या / येत असलेल्या शहरांसाठी भौगोलिक माहिती प्रणाली आधारीत विकास योजना (Geographical Information System based Development Plan-GIS based DP) तयार करणेची बाब सक्तीची करण्यांत आलेली आहे. या योजना अंतर्गत सद्यस्थितीत महाराष्ट्रातील ४४ शहरे समाविष्ट आहेत. या केंद्र सरकारच्या **"अमृत मिशन"** या महत्वाकांक्षी कार्यक्रमा अंतर्गत ४४ शहरांमध्ये अहमदनगर महानगरपालिकेची निवड महाराष्ट्र राज्यात करण्यांत आलेली आहे. त्या अनुषंगाने भविष्यामध्ये अहमदनगर शहराचा भौगोलिक माहिती प्रणाली आधारीत विकास योजना तयार करणेची बाब सक्तीची करण्यांत आलेली आहे. यानुसार भविष्यामध्ये ज्या विकास योजना तयार करणे / सुधारीत करणे / विकास योजनांना १७ वर्षे पुर्ण झालेली आहेत. अशा सर्व नगरपंचायत/ नगरपरिषद/ महानगरपालिका यांचा समावेश आहे. अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ हद्दीची विकास योजना जुलै २००५ मध्ये मंजूर असुन अंमलात येवुन १७ वर्षे कालावधी सन २०२२ ला पुर्ण होणार आहे परंतु केंद्र सरकारच्या **"अमृत मिशन"** या महत्वाकांक्षी धोरणाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेची विकास योजना सुधारीत करण्यासाठी कालावधी पुर्ण होण्यापुर्वी पुढील अनुषंगीक पुर्व कार्यवाही एक वर्षाच्या अगोदरच करणे गरजेचे आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये निर्देश नुसार संबंधीत राज्यातील सर्व महानगरपालिका विकास योजना नव्याने तयार अथवा सुधारीत विकास योजना तयार करतांना सुध्दा अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन समानता/सुलभता व अचुकता आणण्याच्या दृष्टीकोनातुन (GIS) या संगणक प्रणालीचा वापर करुन (GIS) वर तयार करणेचे निर्देश शासन निर्णय क्रमांक टी.पी.एस.१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/ १८ नवि-१३ दिनांक २५/०१/२०१९ नुसार देण्यांत आलेले आहेत.

१) अहमदनगर नगरपरिषदेची स्थापना सन १८५४ साली झालेली असुन दिनांक ३० जुन २००३ रोजी अहमदनगर महानगरपालिकेची स्थापना झालेली आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मुळ हद्द व वाढीव हद्दीचे क्षेत्रफळ एकुण मिळुन ८०.२१ चौ.की.मी. आहे. अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ हद्दीचे क्षेत्रफळ १९.८७ कि.मी. असुन त्यात शहर गावठाण, सावेडी, नालेगांव, केडगांव, माळीवाडा, चाहुराणा खुर्द, चाहुराणा बुद्रुक, भिंगार, मोरचुदनगर इत्यादी गावे समाविष्ट आहेत. अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ हद्दीचा विकास

आराखडा दिनांक ०४ जुलै, २००५ रोजी शासनाने मंजूर केलेला असुन तो दिनांक २२/०८/२००५ पासुन अंमलात आलेला आहे.

२) महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील निर्णय क्रमांक एमयुपी/११७३/२०६६२/प्र.क्र.५५/८९/नवि-१६ मंत्रालय मुंबई - ३२ दिनांक २९/०६/१९९९ आदेशाव्दारे दिनांक ०१/०७/१९९९ रोजी अहमदनगर नगरपरिषदेची हद्दवाढ झालेली आहे. महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे क्षेत्रफळ ६०.३४ चौ.की.मी. असुन त्यात नव्याने सावेडी (पैकी), भिस्तबाग, नागापुर (पैकी), बोल्हेगांव, नालेगांव, केडगांव, माळीवाडा, चाहुराणा खुर्द, चाहुराणा बुद्रुक, भिंगार (पैकी) व मोरचुदनगर इत्यादी गावे समाविष्ठ झालेली आहेत. अहमदनगर महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचा विकास योजना आराखडा दिनांक ०४/०४/२०११ रोजी शासनाकडुन मंजूर झालेला असुन दिनांक १५/०५/२०१२ पासुन अंमलात आलेला आहे.

३) त्यामुळे शहराची झालेली वाढ, लोकसंख्येतील बदल, लोकांच्या बदललेल्या गरजा इत्यादींच्या अनुषंगाने शहराचा नियोजनबध्द विकास आराखडा तयार होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे विकास योजनेला मंजूरी दिलेल्या दिनांकापासुन २० वर्षे पुर्ण होण्यापुर्वी ३ वर्षे अगोदर त्या भागाची विकास योजना सुधारीत करण्याची प्रक्रीया सुरु करणे आवश्यक आहे. किंवा हद्दवाढ झाल्यानंतर हद्दीतील क्षेत्राचे सर्व्हेक्षण करुन विकास आराखडा तयार केल्यानंतर विकास योजनेची संपुर्ण किंवा भागशः फेरतपासणी करणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ अन्वये बंधनकारक असल्याने महानगरपालिकेच्या भौगोलिक माहिती प्रणालीच्या (GIS) आधारे वाढीव क्षेत्रासह संपूर्ण क्षेत्राचा सुधारीत विकास आराखडा तयार करण्याचे काम हाती घेण्यांत आले आहे. त्या अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक टी.पी.एस.१८१८/१६४७/प्र.क्र.२५२/१८/नवि-१३ दिनांक १५/१०/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ हद्द वाढीव हद्द विकास योजना मंजूरीच्या तारखेमध्ये व वर्षामध्ये बदल पडलेला असतो त्यामुळे दोन्ही क्षेत्राच्या मंजूर विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही करतांना १७ वर्षांचा कालावधी पुर्ण होण्याची तारीख व वर्ष वेगवेगळे असते. त्यामुळे अशा मुळ वाढीव हद्द क्षेत्राच्या विकास योजना सुधारीत करणेची प्रक्रीया देखील वेगवेगळया वेळी सुरु करण्यांत येते. मुळ व वाढीव क्षेत्राच्या विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही दोन टप्प्यात करतांना विकास योजना प्रस्तावांचे नियोजन करतेवेळी ब-याच अडचणी येवू शकतात. व ते नियोजन देखील योग्य प्रकारे होवू शकत नाही. सबब नियोजन प्राधिकरणाचे क्षेत्रात मुळ व वाढीव हद्द अशा दोन भागात विकास योजना मंजूर असल्यास पैकी कोणत्याही एका क्षेत्राची विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही सुरु करतांना दुस-या क्षेत्राची विकास योजना देखील त्या सोबतच सुधारीत करणेची कार्यवाही सुरु करतांना दुस-या क्षेत्राची विकास योजना देखील त्यासोबतच सुधारीत करणेची कार्यवाही झाल्यास, अशी एकत्रितपणे विकास योजना सुधारीत करतांना नियोजन प्राधिकरणाच्या संपुर्ण क्षेत्राचा विचार होउन विकास योजना प्रस्तावाचे नियोजन अधिक चांगलया प्रकारे होऊ शकेल व भविष्यात देखील विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही एकाच टप्पयावर आणता येईल. याबाबींचा विचार करुन राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये खालील प्रमाणे निदेश देण्यांत आलेले आहेत.

४) राज्यातील सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती/विशेष नियोजन प्राधिकरणे अथवा अन्य नियोजन प्राधिकरणे यांनी क्षेत्रात जर मुळ व वाढीव हद्द क्षेत्राच्या अशा दोन भागांत विकास योजना मंजुर असतील तर अशा मंजूर विकास योजनांपैकी कोणत्याही एका भागांची विकास योजना मंजुर होऊन अमलात आल्याच्या दिनांकापासुन १७ वर्ष नंतर त्या भागाची विकास योजना सुधारीत करणेची प्रक्रिया सुरु करतांना त्यावेळी नियोजन प्राधिकरणांच्या संपुर्ण क्षेत्राचा विचार होवुन विकास योजना प्रस्तावाचे नियोजन अधिक

चांगल्या प्रकारे करणे शक्य व्हावे व भविष्यात देखिल विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही एकाच टप्प्यावर होण्याच्या दृष्टीने जरी दुस-या भागाची विकास योजना मंजुर होवुन अंमलात आल्याच्या दिनांकापासुन कितीही कालावधी झालेला असेल तरी देखील अशा नियोजन प्राधिकरणांनी संबंधित दोन्ही भागाच्या विकास योजना सुधारीत करणेची प्रक्रिया एकत्रितपणे हाती घ्यावी.

५) शासन निर्णय जा.क्र. टी.पी.एस.१८१०/८३/प्र.क्र.२११/२०१०/नवि-१३ दिनांक ०२/०२/२०१२ न्वये ज्या विकास योजना अंमलात येवुन १७ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. अशा सर्व नियोजन प्राधिकरणाच्या विकास योजना भौगोलिक माहिती प्रणालीच्या आधारे द्रुतगती पध्दतीने तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासनाच्या नगरविकास विभागाचा निर्णय क्रमांक टी.पी.एस.१८१८/१४८९/ प्र.क्र.३०३/ १८/ नवि-१३ दिनांक २५/०१/२०१९ व त्याचे शुध्दीपत्रक दिनांक १७/०६/२०१९ अन्वये निर्गमित केलेले आहे.

६) उपरोक्त सर्व बाबी पाहता तसेच अहमदनगर शहराचा अमृत योजनेमध्ये समावेश व सन २०२२ मध्ये विकास योजनेला १७ वर्ष पूर्ण होत असल्याने अहमदनगर शहराचा सुधारीत व नव्याने झालेल्या हद्दवाढीतील गावांच्या क्षेत्रासह उक्त शासन निर्णयानुसार विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. परंतु तत्पुर्वी याअनुषंगाने सुधारीत क्षेत्राचे नव्याने हद्दवाढ झालेल्या गावांच्या क्षेत्राचे प्रत्यक्ष इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन मशिनद्वारा / ड्रोनद्वारा हद्दीतील मिळकती, रस्ते, नदी, नाले, तलाव, पुल, औद्योगीक क्षेत्र, इलेक्ट्रीक लाईन, शेतीकडील जमीन, शासकीय जमिनी, पडीत जमिनी, वनविभागाच्या जमिनी वगैरे हद्दीतील सर्व बाबींचे ड्रोनद्वारा सुक्ष्म सर्वेक्षण करुन सुस्पष्ट छायाचित्र उपलब्ध करणे नगररचना विभागाने तसेच सक्षम प्राधिकरणाने मंजुर केले ले आउट उपलब्ध करुन नकाशावर बसवुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २५ नुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासनाच्या नगरविकास विभागाचा निर्णय क्र.टी.पी.एस.१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३ दिनांक २५/०१/२०१९ व त्याचे शुध्दीपत्रक दिनांक १७/०६/२०१९ अन्वये भौगोलिक माहिती प्रणालीच्या आधारे विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करणे सदर नकाशास नगररचना अधिकारी नियुक्त झालेल्या अधिकारी यांचेकडून मंजुरी मिळविणे, क्षेत्रफळाचे तपशिल सादर करणे तसेच संपुर्ण शहराचा विकास आराखडा तयार करणेकामी शहरी अहवाल तयार करणे आवश्यक आहे.

७) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ ते ३० अन्वये महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासनाच्या नगरविकास विभागाचा निर्णय क्र.टी.पी.एस.१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३ दिनांक २५/०१/२०१९ व त्याचे शुध्दीपत्रक दिनांक १७/०६/२०१९ नुसार भौगोलिक माहिती प्रणालीद्वारा प्रस्तावित जमिन वापर नकाशा तयार करणे करीता नगररचना ा विभागास माहिती, नकाशे, आराखडे व अहवाल सादर करुन नगररचना अधिकारी नियुक्त झ ालेल्या अधिकारी यांना कामा संबंधी आवश्यक माहिती पुरविणे.

८) महानगरपालिका हद्दीतील नागरिकांच्या व लोक प्रतिनिधी यांच्या अतिक्रमणा बाबतच्या अनुषंगाने वाढत्या तक्रारी दखल घेता शहरातील अतिक्रमणे हटविणे अत्यंत जरुरीचे आहे. तसेच शहरातील विकास कामाच्या अनुषंगाने हद्दीतील रस्ते, शासकीय जागांची हद्द निश्चितीकरणे करीता जमिन योजना प्रमाणित करणे याकामीसाठी रोबोटीक इलेक्ट्रॉनिक टॉटल स्टेशन मशिनच्या शहरातील महानकरपालिकेने सुचविलेले रस्त्यांची, शासकीय जागांचे सविस्तर सर्व्हेक्षण करणे सर्व्हेक्षण नकाशे भुमि अभिलेख/सिटीसर्व्हे विभागाकडुन तपासुन महानगरपालिकेच्या शासकीय हद्दीटाकुन सही शिक्क्यानिशी प्रमाणिकृत करुन महानगरपालिकेस नकाशे सादर

करणे सदर काम हे कुशल स्वरुपाचे व विशेष प्रकारचे असुन हद्दीतील रस्त्यांचे जमिन योजना प्रमाणिकृत करणे अत्यंत जरुरीचे आहे.

जमिन योजना प्रमाणिकृत कामांसाठी खालील बाबींचा समावेश राहील.

१) रोबोटीक इलेक्ट्रोनिक टॉटल स्टेशन मशिनने शहरातील महानगरपालिकेने सुचविलेले रस्त्यांची, शासकीय जागांचे सविस्तर सर्व्हेक्षण करणे.

२) भुमि अभिलेख/सिटीसर्व्हे विभागाकडून सदर कामांसाठी लागणारे गांव नकाशे व सिटीसर्व्हे नकाशे, गटबुक, फाळणीबुक, कमी जास्त पत्रक प्राप्त करणे.

३) भुमी अभिलेख विभागाकडून प्राप्त केलेल्या गांव नकाशा व सिटीसर्व्हे नकाशांच्या आधारे रोबोटीक इलेक्ट्रोनिक टॉटल स्टेशन मशिनव्दारा सविस्तर सर्वेक्षण केलेल्या नकाशावर मिळकतींची, रस्त्यांची व शासकीय जागांची हद्द निश्चित करणे.

४) सर्व्हेक्षण करुन गांव नकाशे व सिटीसर्व्हे नकाशाप्रमाणे हद्द निश्चित केलेले नकाशे उप अधिक्षक भुमि अभिलेख अहमदनगर यांचेकडुन तपासुन सही शिक्क्यानिशी अधिग्रहन करुन महानगरपालिकेस आवश्यक प्रतित सादर करणे.

५) सदर सर्व्हेक्षण केलेल्या नकाशावर बांधकाम रेषा प्रस्तापित करणे

६) भुमि अभिलेख विभागाकडुन प्रमाणिकृत केलेले जमिन योजनेचे नकाशे मुळ ट्रेसिंग पेपरवर प्रिटींग करुन आवश्यक प्रतित महानगरपालिकेस सादर करणे.

७) सदर काम कुशल स्वरुपाचे व विशेष प्रकारचे असुन अत्यंत महत्वाचे असल्याने पुरेपुर अनुभवी सल्लागाराकडून काम पुर्ण करणे महानगरपालिकेस सोयीचे राहील. सद्यस्थितीत हद्दीतील रस्त्यांची अंदाजीत लांबी १०० कि.मीटर

९) महानगरपालिकेच्या हद्दीतील महानगरपालिकेच्या सर्व जागांचे मिळकतीचे कोणतेही दस्तावेज कागदपत्रे महानगरपालिकेकडे उपलब्ध नसतात. कारणे विकास कामाच्या दृष्टीने अडचणी येत असल्याने महानगरपालिकेच्या सर्व जागांचे व मिळकतींची माहिती मिळविणे, जागेवरील सद्यस्थितीची सर्व माहिती दस्तावेज जमा करणे मिळकतीचे ७/१२ रेकॉर्ड उपलब्ध करुन इलेक्ट्रोनिक टॉटल स्टेशन मशिनव्दारे कंटुरसह सर्व्हेक्षण करणे मिळकतींच्या हद्दीवर३०.०० मी. अंतराने कॉन्क्रीट दगड बसवुन डिमार्केशन करुन हद्द कायम करणे महानगरपालिकेचे मालकी दर्शविणारे उपलब्ध दस्तावेज, ७/१२, जागांचे सर्व्हेक्षण नकाशे, कंटुर नकाशे महानगरपालिकेस सादर करणे.

उपरोक्त शासन संदर्भ व अहवाल पाहता वरील प्रमाणे सदरचे काम करणे अत्यंत आवश्यक व निकडीचे असल्याने व विकास योजनेसाठी उपयुक्त असल्याने विषयांकित कामासाठी सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात होणा-या संभाव्य खर्चासाठी तरतूद प्रस्तावित करावी लागणार आहे. सदरस्ती वरील सर्व कामे सल्लागार सेवेत येत असल्याने संपूर्ण कामांकरीता खाजगी सल्लागार संस्थांकडून एकत्रित ई-निविदा मागवून येणा-या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेसाठी मे.महासभेचा ठराव घेण्यास विनंती. आदेशास्तव मा.आयुक्त साहेब यांना सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, उपरोक्त अहवाल स्वयंस्पष्ट आहे. तथापि मा.शासन आदेश दिनांक २५/०१/२०१९ व त्यानंतरचे आदेश पाहता शहर विकास व सुरु असलेले अमृत योजना व डी.पी.चे सुधारणा करणे बंधनकारक असल्याने GIS Survey होणे

क्रमप्राप्त आहे. व विकास योजना विहित पत्र व्यवहार होणे गरजेचे झाले असले कारण उपरोक्त सर्वांचा निर्णय होणे आवश्यक आहे. तरी मे.महासभेस पुढील निर्णयासाठी सादर.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.कुमार वाकळे :-** सदरचा विषय महानगरपालिकेला कशामुळे गरजेचा आहे. यामुळे महानगरपालिकेचा काही फायदा होणार आहे का. नविन भागाचा समावेश यात होणार आहे का. आज काही महानगरपालिकेचे ओपन प्लॉटची नोंद सापडत नाही. मुळ मालकाच्या नावानेच अजुन उतारे निघतात.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** आपण विकास योजना सुधारीत करण्यासाठीची प्रक्रीया विषय चर्चेत आहे. सध्या ओढे नाले बुजवुन ले-आउट तयार केले जातात. तसे तर आता होणार नाही ना.

**मा.महापौर साहेब :-** तसे होणार नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये निर्देश नुसार संबंधीत राज्यातील सर्व महानगरपालिका विकास योजना नव्याने तयार अथवा सुधारीत विकास योजना तयार करतांना सुध्दा अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन समानता/सुलभता व अचुकता आणण्याच्या दृष्टीकोनातुन (GIS) या संगणक प्रणालीचा वापर करुन (GIS) वर तयार करणेचे निर्देश शासन निर्णय क्रमांक टी.पी.एस.१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/ १८ नवि-१३ दिनांक २५/०१/२०१९ नुसार देण्यांत आलेले आहेत.

केंद्र सरकारच्या **"अमृत मिशन"** या महत्वाकांक्षी कार्यक्रमांतर्गत निवड करण्यांत आलेल्या / येत असलेल्या शहरांसाठी भौगोलिक माहिती प्रणाली आधारीत विकास योजना (Geographical Information System based Development Plan-GIS based DP) तयार करणेची बाब सक्तीची करण्यांत आलेली आहे. या योजना अंतर्गत सद्यस्थितीत महाराष्ट्रातील ४४ शहरे समाविष्ट आहेत. या केंद्र सरकारच्या **"अमृत मिशन"** या महत्वाकांक्षी कार्यक्रमा अंतर्गत ४४ शहरांमध्ये अहमदनगर महानगरपालिकेची निवड महाराष्ट्र राज्यात करण्यांत आलेली आहे. त्या अनुषंगाने भविष्यामध्ये अहमदनगर शहराचा भौगोलिक माहिती प्रणाली आधारीत विकास योजना तयार करणेची बाब सक्तीची करण्यांत आलेली आहे. यानुसार भविष्यामध्ये ज्या विकास योजना तयार करणे / सुधारीत करणे / विकास योजनांना १७ वर्षे पुर्ण झालेली आहेत. अशा सर्व नगरपंचायत/ नगरपरिषद/ महानगरपालिका यांचा समावेश आहे.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** अमृत मिशन बाबतची माहिती द्या.

**मा.महापौर साहेब :-** सर्व माहिती सहाय्यक संचालक नगररचना यांनी सविस्तर माहिती दिली आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. केंद्र सरकारच्या "अमृत मिशन" या महत्वाकांक्षी कार्यक्रमा अंतर्गत भौगोलिक माहिती प्रणालिच्या आधारे सुधारीत विकास आराखडा तयार करणेची प्रक्रीया सुरु करणेची प्रक्रीया सुरु करण्यांत यावी.

---*---

**ठराव :-**

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील क्षेत्राचा केंद्र सरकारच्या "अमृत मिशन" या महत्वाकांक्षी कार्यक्रमा अंतर्गत भौगोलिक माहिती प्रणालिच्या आधारे (Geographical Information System based Development Plan-GIS based DP) सुधारीत विकास आराखडा तयार करणेची प्रक्रीया सुरु करणेस ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. मा.शासनाचे निर्देशानुसार सदरचे काम करणे अत्यंत आवश्यक व निकडीचे असल्याने व विकास योजना नियोजनासाठी उपयुक्त असल्याने विषयांकित कामासाठी

लागणारा संभाव्य निधी १५ वा वित्त आयोग, नविन बांधकाम परवानगी घेण्यांत येणा-या विकास भार शुल्काच्या जमा रक्कमेतुन तसेच अमृत योजना व  इतर शासनाच्या विविध योजना अंतर्गत प्राप्त होणा-या निधीतून या सर्व रक्कमेतून सदरच्या कामासाठी येणा-या संभाव्य आर्थिक खर्च भागविण्यांत यावा. त्याअनुषंगाने नगररचना विभागाने याबाबत  त्वरीत ई -निविदा प्रक्रीया करणेबाबत कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

अनुमोदक :- मा.श्री.कुमार बबन वाकळे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा क्रमांक - ५ मंगळवार दिनांक ०८/१२/२०२० रोजी दुपारी १.०० वाजता झालेल्या सभेचे इतिवृत्त :-**

---*---

सभागृहात कल्याणरोड पाणी प्रश्ना संदर्भात नगरसेवकांचे आंदोलन.

मा.श्री.अनिल शिंदे :- कल्याण रोड शहराच्या जवळचा भाग असून या ठिकाणी १०-१० दिवस पाणी मिळत नाही. या भागात शिक्षक सुशिक्षीत लोक राहतात. आयुक्तांनी निवेदन घ्यायला हरकत नाही. या भागात पिण्याचे पाण्याची अत्यंत दयनीय अवस्था आहे. आगरकर मळा लगत हा भाग आहे. शेजारील भाग असून १० दिवस पाणी नाही. नियोजनाचा अभाव आहे. ० % नियोजन आहे. एखाद्या वॉलमनला नगरसेवकाने सांगीतले तेवढयापुरते तो पाणी सोडतो सर्व वॉलमन, वायरमन यांना आपल्या दालनात बोलवा त्यांचे जर प्रश्न सुटत नसतील तर मी या ठिकाणी प्रशासनाचा निषेध करतो आयुक्तांनी खाली येवून निवेदन घ्यावे. एक दिवस सर्वांना बोलावून मिटींग घ्या.

मा.श्री.सचिन शिंदे :- २५ वर्षापासून आम्ही घरपट्टी भरतो वर्षातून ४५ दिवस पाणी भेटते मग कुठुन पैसे द्यायचे आम्हाला दिवसाआड पाणी पाहीजे.

मा.श्री.शाम नळकांडे :- लेव्हल नाही असेच काही अधिकारी सांगतात अधिका-यांना याचे गांभीर्य नाही का.

मा.श्री.अनिल शिंदे :- सार्वत्रिक निवडणूकी पूर्वी सर्वांना सुरळीत पाणी होते. आम्ही विरोधी नगरसेवक म्हणून तर असे होत नाही ना.

मा.महापौर साहेब :- एवढा विषय संपू द्या सभा होवू द्या विषय चालू असतांना तुम्हाला सभागृहात बोलायची संधी दिली.

मा.श्री.कोतकर :- गेल्या १ वर्षापुर्वी अमृत योजनेसाठी माझी समन्वयक म्हणून नियुक्ती केली त्या ठिकाणी काम करत असतांना वेळोवेळी वाद झाले. ब-याचशा अडचणी आल्या काम शेवटच्या टप्प्यात आलेले आहे. काम करत असतांना काही वेळा त्यांच्यात वादही होतात. रस्त्यापासुन ३५ मिटरवरुन लाईन टाकायची रस्त्याच्या जवळून लाईन घ्या असे शेतक-यांचे म्हणणे असते. परंतु भविष्यात रोड वायडिंग झाल्यास अडचणी येतील असे अधिका-यांचे मत आहे. अभियंत्यावर, आमच्यावर जर गुन्हे दाखल झाले तर महानगरपालिकेने आमच्या मागे उभे रहावे लागेल तो शब्द आता आम्हाला द्यावा. सन २०१९-२०२० या काळात स्वच्छ भारत अभियान योजने अंतर्गत या देशाचे पंतप्रधान यांनी चांगला उपक्रम हाती घेतला. सन २०१८-२०१९ या स्वच्छ भारत अभियानास तत्कालीन जिल्हाधिकारी साहेब, मा.खा.सुजयजी विखेपाटील, मा.आमदार संग्रामभैय्या जगताप, मा.महापौर, मा.उपमहापौर, सर्व पक्षीय नगरसेवक, मा.आयुक्त, उपायुक्त सर्व अधिकारी पदाधिकारी या शहरातील जनतेने एक जिवाने काम करुन देशात शहराचा ४० नंबर आणला. तसाच प्रयत्न यावर्षीही केला तर मनपा टॉप १० मध्ये आल्याशिवाय राहणार नाही. यावर्षी महानगरपालिकेने कायकाय उपाययोजना राबविल्या याबाबत माहिती याठिकाणी नाही.

मा.महापौर साहेब :- आंदोलनकर्ते यांना माहिती द्या.

मा.श्री.गणेश भोसले :- आमच्या प्रभागात पाणी येत नव्हते. महानगरपालिकेच्या मुख्य गेटसमोर वॉल आहे. या वॉलचे ५-६ आटे कमी सोडले त्यांनी २२ आटे सोडायला पाहीजे. त्यांच्यावर कोणाची दहशत आहे. आम्ही पाहणी केली त्या माणसाला निलंबीत करा. त्याला कोणी सांगीतले. त्यांनाही निलंबीत करा. जेणेकरुन या पाण्याच्या विषयावर खेळले नाही पाहीजे. अफाक फिटर यांनी आटे चेक करायला कोणाला सांगू नका असे सांगीतले आहे. असे त्या कर्मचा-याने सांगीतले. सातपुते इंजिनियर यांनी जर असे सांगीतले असेल तर त्यांनाही निलंबित करा.

श्री.सातपुते इंजिनियर :- याची पुर्णपणे चौकशी करतो पुढच्या मिटींगमध्ये सांगतो.

मा.श्री.गणेश भोसले :- टेक्नीकली विषय सोडवा. हे जाणुनबुजून कोण करते ते शोधा. हा आजचा विषय नाही. कल्याण रोडचा प्रश्न मार्गी लावा.

मा.श्री.अनिल शिंदे :- कल्याण रोड वरील नागरिकांनी महानगरपालिकेमध्ये ठिय्या आंदोजन केले ते आंदोलन करत असतांना आयुक्तांच्या दालनात गेलो ते सभागृहात आले.१०-१२ दिवस पाणी येत नाही. या नगर शहराला रोज पाणी येते परंतु शहराच्या जवळ असणारा भागात १०-१२ दिवस पाणी येत नाही. पुर्वी प्रशासनाने ४ दिवसांनी पाणी देवू असे लेखी दिले. दिड वर्ष झाले १०-१२ दिवसांनी पाणी मिळते ते पाणीपट्टी भरीत नाहीत का. आम्हाला पाणी कधी मिळणार.

श्री.सातपुते इंजिनियर :- शहराची लोकसंख्या ४.५० लाखावर गेली आहे.

मा.श्री.अनिल शिंदे :- फेज-२ मधून पाण्याच्या टाकीत पाणी का जात नाही.

मा.महापौर साहेब :- पाउुलबुधे साहेब ऑनलाईन आहेत त्यांना बोलू द्या.

श्री.सातपुते इंजिनियर :- सध्या टाक्यात येणारी पाईप लाईन त्या क्षमतेची नाही. जेंव्हा ते काम पुर्ण होईल तेव्हा टाकीत पाणी येईल व टाक्या भरतील.

मा.श्री.अनिल शिंदे :- बायपासने पाणी द्या.

मा.श्री.कोतकर मनोज :- स्थायी समितीच्या मिटींगमध्ये कल्याण रोडचा पाणी प्रश्न नळकांडेनी मांडला सातपुतेंना सांगीतले. तिथल्या नागरिकांना घेवून जा व पाणी प्रश्न सोडवा असे सांगीतले त्यावेळेस सातपुते तेथे होते. त्याचे पुढे काय झाले.

मा.श्री.अनिल शिंदे :- लालटाकीच्या पाण्याच्या टाकीतुन संपवेलला पाणी जाते. त्या संपवेलला २ घंटे पाणी दिले तर ४ थ्या दिवशी पाणी येईल.

मा.श्री.नळकांडे :- येत्या काही दिवसात कल्याण रोडचा पाणी पुरवठा सुरळीत झाला नाही तर अधिका-यांचे नळ कनेक्शन आम्ही तोडू. अधिका-यांना दालनात बसु देणार नाही. सातपुतेंनी काय उपाय योजना केल्या त्या सांगा.

मा.श्री.संपत बारस्कर :- या लोकांना पाणी जात नाही. नागरिकांनी शांत बसावे. प्रशासनाने उत्तर दिले तर विषय संपेल. आम्ही सुध्दा नागरीक सभागृहात आणू शकतो. ढवणवस्तीत पाणी येत नाही. कल्याण रोडचा पाणी प्रश्न सुटला पाहीजे.

मा.श्री.कोतकर मनोज :- बायपासने केडगांवला ४ दिवसांनी पाणी येते. आम्ही तुमच्या पाण्या साठी वेळोवेळी भांडतो. सर्वच्या सर्व नगरसेवकांची इच्छा आहे. कल्याण रोडचा पाणीप्रश्न सुटला पाहीजे.

मा.महापौर साहेब :- कल्याण रोडचा पाणी प्रश्न गंभीर आहे कोणामुळे थांबला. वॉलमन खोडसाळपणा करतात का याची सखोल चौकशी करा. त्यांना तात्काळ पाणी दिले जाईल याची व्यवस्था करा. सर्व नगरसेवकांना, नागरिकांना बरोबर घ्या. तात्काळ त्यांना पाणी मिळण्यासाठी फिटर, वॉलमन यांना ताबडतोब बोलावून घ्या. तातडीने प्रश्न मार्गी लागलाच पाहीजे. उपलब्ध व्यवस्थेत कसे पाणी देता येईल ते पहा. सर्व प्रश्न सोडवा. काही भागामध्ये पाणी जात नाही.

मा.श्री.अविनाश घुले :- सभा संपल्या बरोबर पाठवा.

मा.महापौर साहेब :- लगेच पाठवा.

डॉ.श्री.सागर बोरुडे :- मेहेत्रे यांनी व्हीआरएस अर्ज दिला त्यांचा चार्ज कोणाकडे दिला.

मा.सौ.पुष्पाताई बोरुडे :- बालिकाश्रम रोड ते कल्याण रोड भाग जास्त लोकसंख्या असलेला भाग आहे. नुकताच येथील नगरसेवकांनी मोर्चा आणला सर्व महिलांच्या वतीने आवाहन करते पाणीप्रश्न सुटला पाहीजे. नागरिकांचे फोन येतात. पाणी प्रश्न सोडवा.

मा.श्री.अविनाश घुले :- घाण पाण्याचा विषय मागे घेतला. तुम्ही लोक देतो म्हणाले पण अजुन माणसे मिळाली नाहीत. दोनच माणसे आहेत.

श्री.सातपुते इंजिनियर :- माणसे देणे आस्थापना विभागाचे काम आहे. मार्केट विभागाकडील ८ कर्मचा-यांपैकी ५ हजर झाले ५ पैकी ३ वैद्यकीय रजेवर आहेत. दोन माणसे आहेत. त्यांना टिकाव उचलत नाही. आस्थापना कडून माणसे मिळाली पाहीजे. माझे काम काम करुन घ्यायचे आहे.

मा.श्री.अविनाश घुले :- माझ्या झोनला अजुन माणसे मिळाली पाहीजेत. मला माणसे मिळाल्या शिवाय मी खाली बसणार नाही. मानधनावर माणसे घ्या. १५ ते २० कर्मचारी घ्या.

मा.सौ.मालनताई ढोणे :- वॉर्ड नंबर ९ मध्येही हा प्रश्न आहे. पुर्ण शहराचा प्रश्न आहे. लोकांना हे आजाराचे आमंत्रण आहे.

मा.श्री.संपत बारस्कर :- २५ लोक मानधनावर घेण्याचा ठराव करा.

मा.आयुक्त साहेब :- कोंडवाडयाच्या लोकांची मी बदली केली. प्रभागात सोडायला सांगीतले त्यांचेकडे दिल्यानंतर २ लोक रजेवर गेले. त्यांचेकडे दोन लोक आहेत. तुमचेकडे रिपोर्ट दिलेला नाही. त्यांचा रिपोर्ट करा. त्यांच्यावर कारवाई प्रस्तापित करतो. धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. काम करणा-या मनुष्य बळाची कमतरता भासते आहे. आउट सोर्सिग व्दारे भरती करता येईल. कामाच्या दृष्टीने करता येईल ते करा. ३ कर्मचारी सातपुते यांचेकडेस हजर झालेले नाहीत. जे कामावर आलेले नाही त्यांचे सर्वांचे पगार रोखुन ठेवा. झोनवाईज लोक देतो. त्यांचा पगार कपात करुन मानधनावरील लोकांना पगार देवू.

मा.श्री.गणेश भोसले :- आयुक्त जे बोलले त्यात अडचण येईल. अर्धे लोक आउट सोर्सिंगने भरा. कर्मचारी सीक रजेवर जातील. तात्पुरते १०-२० लोक द्या त्यानंतर काय व्यवस्था करायची ती करा.

मा.श्री.अविनाश घुले :- माणसे कधी येणार ते सांगा. महत्वाचा प्रश्न आहे.

मा.आयुक्त साहेब :- तुर्त १० माणसे कॉन्टॅक्ट बेसिसवर घ्यायला सांगतो. बदली झालेल्या कर्मचारी व रजेवर गेलेल्या कर्मचा-यांचे पगार मी गोठवतो. व त्यांचा पगार तिकडे ट्रांन्सफर करतो.

मा.महापौर साहेब :- वॉलमन १०-१० वॉल आटे सोडतात. यंत्रणेची मिटींग घ्या नियोजन व्यवस्थीत करा.

मा.श्री.अविनाश घुले :- वॉलमन वॉल सोडतो. शेवटच्या घरात पाणी येते का नाही ते सुध्दा पहात नाही.

मा.श्री.आसीफ सुलतान :- आमच्या प्रभागात याच समस्या आहेत. पाणी पुरवठा विभागाने वारंवार कर्मचा-यांची वाणवा आहे. ते रिपोर्ट दिले आहेत. याला जबाबदार कोण एक ठेकेदार मेटेनन्ससाठी नेमला त्याच्याकडून कामगार मिळत नाही.

श्री.सातपुते इंजिनियर :- लेबर साठी ठेकेदार बोलावला तो काम घेत नाही.

मा.श्री.आसीफ सुलतान :- किती दिवसात लोक घेणार. पंधरा दिवसा नंतर काम झाले नाही तर मी शोले स्टाईल आंदोलन करील.

श्री.सातपुते इंजिनियर :- २० लोक भेटले तर प्रत्येक प्रभागात ४-४ देता येतील.

मा.आयुक्त साहेब :- ८-१० दिवसात काम होणार असेल तर एक्स्ट्रा माणसे लावून ५-७ लोक काढून देता येतील मी पाहतो.

मा.श्री.आसीफ सुलतान :- ड्रेनेज लाईन खचल्याने रस्त्यावर पाणी येते. चोकअप निघत नाही. अंडरग्राउंडचे लोक घेतले तर प्रश्न मिटेल.

मा.महापौर साहेब :- संबंधित कर्मचा-यांनी नगरसेवक यांची भेट घ्यावी.

मा.श्री.आसीफ सुलतान :- झाडू कामगार मिळाले नाहीत. माझ्या पत्रांना विभागाने अजुन उत्तर दिलेले नाही.

मा.महापौर साहेब :- पैठणकर यांनी लवकर उत्तर द्यावे.

मा.श्री.आसीफ सुलतान :- सर्व शहरात पॅचिंग झाले. आमच्या प्रभागात झाले नाही.

मा.श्री.रामदास आंधळे :- वॉर्ड क्रमांक ४ मध्ये दोन पाईप लाईन आहेत जुन्या लाईनला नविन पाईप लाईन जोडता येईल का? सफाई कामगार येत नाहीत.

मा.महापौर साहेब :- उद्या पाहून घ्या.

मा.सौ.मालनताई ढोणे :- सोनेवाडी येथील विहिरी वरुन केडगांवला होणारा पाणी पुरवठा अनेक वर्षापासुन बंद असल्याने तेथील पंप व जनरेटरची काय परिस्थिती आहे. त्याचा वापर बीडीसीडी येथे का केला जात नाही. महानगरपालिकेला विज वितरण कंपनीचे महिन्याला पाणी पुरवठा विभाग व विद्युत विभागाचे दोन ते अडीच कोटी बील येते बील कमी होण्यासाठी प्रयत्न होतात का. महानगरपालिका स्वत: विज निर्मितीसाठी काय उपाययोजना करणार आहे का. उद्याने व जॉगींग ट्रॅक लवकर खुली करावीत.

मा.महापौर साहेब :- सातपुते यांनी पाहणी करावी.

मा.सौ.मालनताई ढोणे :- विद्युत एनर्जी ऑडीट बाबत संबंधित विभागाला कळवावे.

उद्यान विभाग प्रमुख म्हसे :- साहेबांकडे प्रस्ताव ठेवला.

मा.श्री.संपत बारस्कर :- अहमदनगर शहराला ७५ टक्के शास्ती माफी दिली त्याबद्दल मा.महापौर व आयुक्त यांचे आभार मानतो. शास्ती माफी मध्ये जमा झालेले पैसे विकास कामासाठी वापरा. नागरिकांना आम्ही सांगतो. आर्थीक बाजू भक्कम नसल्याने विकास कामे झाली नाहीत. विकास कामासाठी पैसे राखुन ठेवावे. कामगार युनियनच्या मागण्या पुर्ण कराव्यात. लाईट बील भरावे. विकास कामासाठी रक्कम राखुन ठेवावी.

**मा.महापौर साहेब :-** विकास कामासाठी पैसे राखुन ठेवा. योग्य तो निर्णय घेवू.

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** महानगरपालिकचे अमृत योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर शहराला आवश्यक पाणी राखीव ठेवून शिल्लक पाणी कॅन्टोन्मेंट बोर्ड भिंगार शहराला पाणी दिल्यास त्यांची पिण्याच्या पाण्याची समस्या कायमस्वरुपी सुटण्यास मदत होईल.

---*---

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव विभाग.AMC.-
दिनांक : ०८/०३/२०२१.

संबंधित खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

सदर महासभेमध्ये विषयांबाबत झालेल्या चर्चेनुसार संबंधित विभागाने योग्य ती कार्यवाही करावी.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.